# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक ११/१०/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०९ स. ११.३० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.२६/०९/२०१८ रोजीचे सुचना क्र.७ व ८ चे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- दि.२६/०९/२०१८ रोजीचे सुचना क्र. ७ व ८ चे इतिवृत्त एकमताने कायम करण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल सांळुखे सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | महिला मंडळे/ महिला बचत गट व वैयक्तीक महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुची दिवाळी बाजारपेठ आयोजित करणे. | ठराव :- *सदरचा विषयांवर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन मा.महिला बालकल्याण समितीने शिफारस केल्यानुसार प्रति स्टॉल प्रति दिन १००रु.भाडे व महिला मंडळे/महिला बचत गट व वैयक्तीक महिलांसाठी उत्पादित वस्तुची दिवाळी बाजारपेठ आयोजन १) गुरुकृपा हॉल विरार (पुर्व), २)कृष्णा मोरु पाटील विदयालय नालासोपारा (पु), ३)साईबाबा मंदिर मैदान नालासोपारा (प.), ४)समाज उन्नती हॉल वसई रोड (प.), ५)गणपत राव हॉल वसई गाव (प.), तसेच नव्याने वाढीव ६)अप्पा मैदान वालीव इ. ठिकाणी बाजारपेठाचे आयोजन करण्यात यावे.याठिकाणी हॉल उपलब्ध न झाल्यास याबाबत बाजारपेठेसाठी मंजूर ठेकेदारामार्फत मंडपाची व्यवस्था करण्यास आवश्यकता असल्यास बाबनिहाय दरपत्रके काढण्यास ही सभा मान्यता देत आहे. या ६ ठिकाणी महानगरपालिकेच्या मंजूर ठेकेदारमार्फत, आवश्यक साहित्य '८X५', झालर, टेबल, कापडी पार्टीशन,मंडप,खुर्ची,फॅन, फोटोग्राफर, बॅनर्स, बुके, पाणी, साऊंड सिस्टम, जनरेटर, गेट बॅनर,चहा, नाश्ता, हॉल भाडे देण्यास तसेच प्रत्येक बाजारपेठेच्या ठिकाणी २ सिक्युरिटी गार्ड व तात्पुरत्या स्वरुपात विदयुत कनेक्शन चार्जेस भरणा करण्यास इत्यादी साठी एकुण येणा-या रक्कम रु.२५,००,०००/-रु. अक्षरी (पंचवीस लक्ष रुपये मात्र) खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.तसेच उपरोक्त नियोजित बाजारपेठा ठिकाणी बदल झाल्यास अन्य ठिकाणी दिवाळी बाजारपेठ भरविण्याचे अधिकार ही सभा मा.सभापती महिला व बालकल्याण समिती यांना देण्यास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.*<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्रीम.विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना व अनाथ आश्रमातील विद्यार्थ्यांना १ दिवसीय सहलीचे आयोजन करण्याबाबत. | ठराव :- सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली असून वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाने शिफारस केल्यानुसार महानगरपालिका हद्दीतील ११६ जि.प. शाळा व २१ अनाथ आश्रमातील एकूण २०,६०२ विद्यार्थ्यांना एक दिवसीय सहलीचे आयोजन याझुपार्क येथे करण्याकरीता विना निविदा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५ (२) २ अ नुसार करणेकामी याबाबत होणाऱ्या रुपये ५६,६५,५५०/- (छपन्न लाख पासष्ट हजार,पाचशे पन्नास रुपये) या येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच ह्याबाबत जि.प.शाळा ते याझुपार्क व याझुपार्क ते शाळेपर्यंत विद्यार्थी/विद्यार्थींना सोडण्याबाबत महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमार्फत विनामुल्य घेण्यांत यावे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जि.प शाळा, अनाथ आश्रम, अनुदानीत शाळा व विनाअनुदानित शाळेतील विदयार्थीना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श याबाबत मार्गदर्शन करणेबाबत. | ठराव :- सदरचा विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन महानगरपालिका हद्दीतील जि.प शाळा , अनाथ आश्रम,अनुदानित शाळा व विनाअनुदानित शाळेतील विदयार्थ्यांना चांगला स्पर्श व वाईट स्पर्श या बाबत सेवाभावी संस्था/खाजगी संस्था तसेच स्थानिक इच्छुक ठेकेदार यांचा मार्फत दरपत्रके मागविणकरिता व प्रति मार्गदर्शन ७०० रु. याप्रमाणे ४०० शाळा करिता येणा-या २,८०,०००/- रु.खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्रीम.विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | प्रभाग समिती जी वॉर्ड क्र.८९ मध्ये सातिवली गिदराईपाडा येथे २० सीटचे शौचालय बांधणे कामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन सदर कामी शौचालयाच्या छतासाठी सिमेंटचे पत्रे प्रस्तावित केले होते.त्याबदली आर.सी.सी. स्लॅबचे छत करण्याचे सूचित करण्यात आले. त्यानुसार सिमेंट पत्र्याऐवजी आर.सी.सी. स्लॅबचे छत प्रस्तावित करणेत यावे. असे ही सभा ठरवित आहे त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रु. २१,३१,७४४/-रक्कमेच्या अंदाजपत्रकीय खर्चासप्रशासकीय व वित्तिय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर नाना पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेमार्फत व MMRDA मार्फत बांधणेत आलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या देखभालीबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. 'एकलव्य फाऊंडेशन' ह्या नोंदणीकृत अशासकीय संस्थेमार्फत वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उपरोक्त नमुद १४ सार्व. स्वच्छतागृहे ३० वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती सहित चालविणेस देणेकामी ही सभा मान्यता देत आहे. सदर स्वच्छतागृहांच्या वापरासाठी मासिक शुल्क रु. १०० प्रति कुंटूंब दर आकारणेस तसेच ह्या बाबत संस्थेशी योग्य त्या अटी-शर्तीस आवश्यक तो करार करणेचे अधिकार मा.आयुक्तांना देणेंत येत आहेत.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नगरचना विभागाकरिता ड्राफ्टसमन, सर्व्हेअर व ड्रेसर या संवर्गाकरिता मनुष्यबळ पुरविणेकामी ई-निविदा मागविणेबाबत. | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नगररचना विभागासाठी प्रस्तावात नमुद केल्यानुसार ड्राफ्टसमन -३, सर्व्हेअर-२, व ट्रेसर-१ अशा एकूण ६ पदांकरीता प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन बांधकाम व पाणीपुरवठा विभागासाठी अतिरीक्त १ ड्राफ्टसमन व १ सर्व्हेअर अशी एकूण दोन अतिरीक्त पदे घेण्याकरीता मान्यता देण्यांत येत आहे. त्यास अनसरुन ड्राफ्टसमन -४, सर्व्हेअर- ३, व ट्रेसर-१ अशी एकूण ८ पदे सन २०१८-१९ व २०१९-२० या दोन वित्तीय वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने भरणे कामी व येणाऱ्या वार्षिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसह ई-निविदा प्रक्रीया करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | प्रभाग समिती -डी मधील वॉर्ड नं. ५७ मध्ये सारस्वत बँक ते रश्मी रेसीडेन्सी पर्यंत रस्ता | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. नेवाळकर एंटरप्रायजेस यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) ५.००% जास्त दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. या |

| | | |
|---|---|---|
| | खडीकरण व डांबरीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठरावान्वये मा.स्थायी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | सुर्या टप्पा -३ योजनेतून वाढीव उपलब्ध झाल्याने शहरातील उंच साठवण टाकी विद्युत पंपाच्या सहाय्याने न भरता थेट गुरुत्वदाबाने भरणेस्तव आवश्यक त्या ठिकाणची जलवाहिनी बदलणेस मंजूरी मिळणेबाबत. | ठराव:- उपरोक्त विषयाबात सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, सुर्या टप्पा-३ योजनेतुन वाढीव पाणी उपलब्ध झाल्याने शहरातील उंच साठवण टाकी विद्युत पंपाच्या सहाय्याने न भरता थेट गुरुत्वदाबाने भरणेस्तव आवश्यक त्या ठिकाणची जलवाहिनी बदलणेस ही सभा मंजूरी देत असून सदर कामासाठी अंदाजपत्रकीय खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर कामी लागणारे पाईप महानगरपालिकेच्या उपलब्ध साठ्यातुन वापरण्यास व सदर काम लवकरात लवकर हाती घ्यावयाचे असल्याने १५ दिवसांच्या कालावधीची नोटीस काढून ई-निविदा कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | वाहन विभागाकडील सन २०१८-१९ वित्तीय वर्षामधील समाप्त झालेली तरतुद वाढीव करुन मिळणेबाबत. | **ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करुन चर्चा केली असता पाणीपुरवठा विभागाकडील विकास निधी अंतर्गत सुसरी, राजिवली, सातिवली, कामण बंधारे बांधणे, पाणीपुरवठा योजना राबविणे देहरजा एन. पी. व्हि.भरणे व इतर नविन उद्भव तयार करणे, तसेच कवडास बंधाऱ्याची उंची वाढविणे तसेच सुर्या नदी पात्रात ५ बंधारे बांधणे.या लेखाशिर्षातील तरतुद २ कोटी वाहन विभागाकडील लेखाशिर्षानिहाय वर्ग करणेस आजची सभा मंजूरी देत असून अंतिम मंजूरीकरिता सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपूढे ठेवणेस हि सभा शिफारस करीत आहे.**<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | शालेय व आंतर जिल्हा क्रीडा स्पर्धा २०१८-१९ ऑनलाईन प्रक्रिया राबवणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार शालेय जिल्हा क्रीडा स्पर्धेचे रजिस्ट्रेशन ऑनलाईन पध्दतीने करणेकामी मे. Mobeesolution Technologies ठाणे यांच्या दरपत्रकास आजची सभा मंजूरी देत आहे. मे. Mobeesolution Technologies ठाणे यांचेकडून तयार करण्यांत आलेल्या जिल्हा क्रीडा स्पर्धा ऑनलाईन वेब ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर वेबबेस लिंक एक वर्षाकरीता खरेदी करुन, त्यांचेशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेस तसेच कामाचे होणारे देयके अदा करणेकामी एकूण रू. ६५,०००/-इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए बोळींज प्रभाग समिती बी विरार | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका मार्फत प्रभाग ए,बी व सी कार्यालया हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांकरीता दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ ते दिनांक ५ डिसेंबर २०१८ या कालावधीत शालेय कला-क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणेकामी व त्याकामी येणाऱ्या एकूण अंदाजित रु. ४५ लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | (पुर्व) व प्रभाग समिती सी चंदनसार वसई हद्दितील शालेय विदयार्थ्यांकरिता आंतरशालेय कला क्रीडा स्पर्धाचे २०१८ चे आयोजन दि.३० नोव्हेंबर २०१८ ते ५ डिसेंबर २०१८ करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | शालेय कला-क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद बाबीचे व त्याअनुंषगिक बाबीचे वार्षिक दर मंजूर असल्यास वार्षिक निविदाकार यांना कामाचे कार्यादेश देवून कामे करुन घेण्यासाठी याचबरोबर ज्या बाबींकरीता वार्षिक दर मंजूर नाही अशा बाबींकरीता दरपत्रके, ई-निविदा मागविणेची कार्यवाही प्रभाग समिती स्तरावर करुन घेण्यास व त्या कामीची देयके प्रभाग स्तरावरुन अदा करणेंस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. शालेय कला-क्रीडा स्पर्धाकरीता प्रस्तावात नमुद पंच, परिक्षक यांना प्रती दिवस प्रती व्यक्ती रु. ७००/- इतके मानधन देण्यांत यावे व याकामी अग्रीम घेवून संबंधितांस मानधन रोखीने अदा करावे याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. दिलीप गोवारी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | प्रभाग समिती आय मधील वॉर्ड क्र.११० मधील तलावामध्ये रंगीत कारंजे बसविणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. अरविंद एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती जी वालीव प्रभाग समिती एच नवघर व प्रभाग समिती आय वसई हद्दितील शालेय व महाविदयालयीन विदयार्थ्यांकरिता आंतरशालेय कला क्रीडा महोत्सव २०१८ चे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका मार्फत प्रभाग जी,एच व आय कार्यालया हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांकरीता दिनांक ०५ डिसेंबर २०१८ ते दिनांक ०८ डिसेंबर २०१८ या कालावधीत शालेय कला-क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणेकामी व त्याकामी येणाऱ्या एकूण अंदाजित रु. ३० लक्ष इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. शालेय कला-क्रीडा स्पर्धेचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमुद बाबीचे व त्याअनुंषगिक बाबीचे वार्षिक दर मंजूर असल्यास वार्षिक निविदाकार यांना कामाचे कार्यादेश देवून कामे करुन घेण्यासाठी याचबरोबर ज्या बाबींकरीता वार्षिक दर मंजूर नाही अशा बाबींकरीता दरपत्रके, ई-निविदा मागविणेची कार्यवाही प्रभाग समिती स्तरावर करुन घेण्यास व त्या कामीची देयके प्रभाग स्तरावरुन अदा करणेंस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे. शालेय कला-क्रीडा स्पर्धाकरीता प्रस्तावात नमुद पंच, परिक्षक यांना प्रती दिवस प्रती व्यक्ती रु. ७००/- इतके मानधन देण्यांत यावे व याकामी अग्रीम घेवून संबंधितांस मानधन रोखीने अदा करावे याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | वसई विरार शहर महानगरपालिका नालासोपारा विभागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय कला-क्रीडा महोत्सव | **ठराव :-** सदर विषयाबाबत आजच्या स्थायी समितीच्या सभेत सविस्तर चर्चा होऊन महानगरपालिकेच्या वतीने नालासोपारा शालेय कला-क्रीडा महोत्सव २०१८ स्पर्धेचे आयोजन करण्यास आजची सभा मान्यता देत आहे. नालासोपारा शालेय कला-क्रीडा स्पर्धेसाठी येणारे पंचपरिक्षक कला व क्रीडा शिक्षक यांचे प्रतिदिवस मानधन रु. ७००/- याप्रमाणे तसेच स्पर्धेच्या उद्घाटन व सांगता समारंभासाठी येणारे पाहुणे यांचे मानधन रोखीने देणेस तसेच पंचपरिक्षक व पाहुणे यांना द्यावयास लागणारी रक्कम अग्रीम स्वरुपात घेण्यांत यावी. कला-क्रीडा |

| | | |
|---|---|---|
| | २०१८ साजरा करणे बाबत चर्चा करुन निर्णय घेणे. | स्पर्धेचे आयोजन करणेकामी प्रस्तावात नमूद बाबींचे व त्या अनुषंगिक बाबींचे वार्षिक दर मंजूर असल्यास वार्षिक मंजूर निविदा धारकांस कामाचा कार्यादेश देवून कामे करुन घेणेस त्याचबरोबर ज्या बाबींकरीता वार्षिक दर मंजूर नाही अशा बाबीकरीता ३ लक्ष आतील कामाचे दरपत्रके, ई-निविदा मागवून प्रभाग समिती स्तरावर दरपत्रकाची व ई-निविदेची कार्यवाही करावी. या सर्व बाबींकरीता येणाऱ्या एकूण ४५ लक्ष इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील   सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील सातिवली विभागात भरणारा दैनंदिन व आठवडा बाजार शुल्क ठेका वसुलीचा सन २०१८/१९ चा वार्षीक ठेक्यास (ई-निविदा) प्रक्रीयेस प्रशासकीय व आर्थीक मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा होऊन प्रभाग समिती-जी अंतर्गत सातीवली येथील आठवडा बाजार व दैनंदिन बाजार मंजूर ठेक्याच्या वाढीव दर व वाढते साहित्यांचे दर लक्षात घेता सन २०१७/१८ या वित्तीय वर्षातील बाजार शुल्काच्या ठेक्यात ३५,३०,०००/- (अक्षरी रु. पसतीस लाख तीस हजार मात्र) तसेच सदर रक्कमेवर १०% वाढ रु. ३,५३,०००/- मात्र गृहीत धरून सन २०१८/२०१९ साठी रक्कम रु. ३८,८३,०००/- (अक्षरी रु. अडतीस लाख त्र्याऐंशी हजार मात्र) अपेक्षित रक्कम गृहीत धरुन दोन लखोटा पध्दतीने सिलबंद निविदा मागवून बाजार कर वसुलीसाठी निविदा काढण्याबाबत वर्तमान पत्रात जाहिर निविदा प्रसिध्दी करण्यास ही सभा प्रशासकीय व त्या अनुषंगिक खर्चास वित्तीय मान्यता देत आहे. अटी व शर्तीमध्ये मंजूर निविदा धारकांचे प्राप्त होणाऱ्या ई-निविदा रक्कमेवर शासकीय दराने नियमानुसार जीएसटी (G.S.T.) कर घेणे आवश्यक आहे. सदर निविदा प्रक्रिया २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता ठेका ई-निविदा पध्दतीने निश्चित करण्याकरीता आणि सदर ई-निविदा पुर्ण होईपर्यंत मागील ठेकेदारास वाढीव कालावधीसाठी १०% वाढीने मुदतवाढ देण्याकरीता सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासाठी ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना.पाटील   सूचक :- मा.श्री. अतुल सांळुखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका